# विशेष पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

दिनांक :- ११/०३/२०२५

**मृतक नामे विनोद शंकर शिपलेकर याचे मारेक-यास अवघ्या २४ तासाचे आत अटक करुन खुनासह, खुनाचा प्रयत्न व चोरीचे ०२ गंभीर गुन्हे उघडकीस आणले**
**स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ ची कारवाई.**

दिनांक १०/०३/२०२५ रोजी फिर्यादी नामे कमलेश सुर्यभान वाठोरे रा. कोलाम पोड लोहारा, यवतमाळ यांनी पोलीस स्टेशन लोहारा येथे ऐवुन तक्रार दिली की, त्याचा साळा नामे विनोद शंकर शिपलेकर यास एस.के. बार च्या मागे मोकळया जागेत कोणीतरी अज्ञात इसमाने धारदार शस्त्राने वार करुन खुन केला आहे. अशा फिर्यादीच्या तक्रारी वरुन पोलीस स्टेशन अवधुतवाडी अ.प.क्र. ९८/२०२५ कलम १०३ (१) भा.न्या.स. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांर्भीय लक्षात घेवुन मा. पोलीस अधिक्षक साहेब यांनी तात्काळ सदरचा गुन्हा उघडकीस आणुन आरोपीचा शोध घेवुन आरोपी अटक करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखा यांना देण्यात आले. त्यावरुन घटनास्थळाच्या आजुबाजच्या परीसरातील सिसिटीव्ही फुटेज व तांत्रीक बाबींचे संकलन करण्यात आले या सर्व तांत्रीक बार्बीवरुन व मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन गुन्हयातील आरोपी नामे १) शिवम प्रेमदास राठोड वय १९ वर्ष रा. एम.आय.डी.सी. लोहारा, २) वंश संजय कोटेकर वय १९ वर्ष रा. मुंगसाजी नगर, लोहारा असल्याचे निष्पण झाले. सदरचे आरोपी हे चोरीची चारचाकी वाहन क्र. एम.एच. २९ जे. ३०९ मारुती ८०० घेवुन नेर रोड वरील येलगुंडा परीसरात लपुन असल्याची गोपनिय माहीती सपोनि संतोष मनवर यांना मिळाली त्या वरुन त्या परीसरात जावुन आरोपीचा शोध घेतला असता दोन्ही आरोपी पोलीसांना पाहुन चारचाकी वाहणाने नेर रोडने पळुन जात असतांना आरोपीच्या वाहनाचा पाटलाग करुन पुढे सापळा रचुन दोन्ही आरोपी ताब्यात घेण्यात आले. दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांची कौशल्यपुर्णक विचारपुस केली असता त्यांनी दि.०९/०३/२०२५ रोजी रात्रीचे सुमारस एस.कुमार बार मध्ये एका ईसमास बरोबर वाद करुण बारच्या बाहेर आल्यानंतर त्यास चाकु मारुन गंभीर जखमी केल्याचे तसेच त्यानंतर पुढे काही अंतरावर जावुन मतक नामे विनोद शिपलेकर याच्याशी वाद करुण त्यास चाकुने वार करुन जिवे मारल्याची कबुली दिली तसेच सदर गुन्हे करणे करीता एक दुचाकी वाहन व घटनास्थळावरुन पळुन जाणे करीता एक चारचाकी वाहण चोरी केल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपीतांकडुन एकुण 55,000/- चा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन दोन्ही आरोपीतांना पुढिल कारवाई करीता पोलीस स्टेशन लोहारा यांच्या ताब्यात देण्यात आले.

सदर ची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक यवतमाळ श्री. कुमार चिंता सा., अपर पोलीस अधीक्षक श्री. पियुष जगताप सा., उपविभागीय पोलीस अधिकारी,यवतमाळ श्री. दिनेश बैसाने सा., पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ श्री. सतिश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संतोष मनवर सफौ/ योगेश गटलेवार, पोहवा/अजय डोळे, पोहवा/विनोद राठोड, पोहवा/ प्रशांत हेडाऊ पोहवा/ निलेश राठोड, पोहवा/कविश पाळेकर, पोहवा/रितुराज मेडवे पोशि/दिगांबर पिलावन,पोशि/आकाश सहारे सर्व स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

(संतोष मनवर)
सहायक पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ.